॥ शुक्रतारा मंदवारा, चांदणे पाण्यातुनी ॥

गायिकाः सुधा मल्होत्रा
गायकः आरुण दाते

शुक्रतारा मंदवारा, चांदणे पाण्यातुनी
चंद्र आहे स्वप्न वाहे, धुंद या गाण्यातुनी ।
आज तू डोळ्यात माझ्या, मिसळुनी डोळे पहा
तू अशी जवळी रहा ॥ धृ. ॥

मी कशी शब्दात सांगू, भावना माझ्या तुला,
तू तुझ्या समजून घे रे, लाजणार्या या फुला ।
अंतरीचा गंध माझ्या, आज तू पवना वहा
तू असा जवळी रहा ॥ १ ॥

लाजर्या माझ्या फुला रे, गंध हा बिलगे जिवा,
अंतरीच्या स्पंदनाने, अन थरारे ही हवा ।
भारलेल्याः या स्वरांनी, भारलेला जन्म हा,
तू अशी जवळी रहा ॥ २ ॥

शोधिले स्वप्नात मी, हे कधी जागेपणी,
दाटुनी आलास तू रे, आज माझ्या लोचनी ।
वाकला फांदेपरी, आता फुलांनी जीव हा
तू असा जवळी रहा ॥ ३ ॥